**संक्षिप्त फौ.ख.क्र. ९५४/२०२५** **निशाणी क्र. २९/क लगत**

**फिर्यादीपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ यांची जबाणी**

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | प्रकाश तुकाराम मांडवकर |
| वय | - | ५० वर्षे |
| व्यवसाय | - | नोकरी-पोहेकॉ.बनं.६२४ |
| राहणार | - | हुपरी पोलीस ठाणे |

---

**सरतपास फिर्यादी मार्फत विधीज्ञ श्री.एस.आर.साळोखे.**

१. दि. ३१/०१/२०२५ रोजी मी हुपरी पोलीस ठाणेत पोहेकॉ म्हणून कार्यरत होतो. महावीर अशोक पिंपळे यांनी त्या दिवशी आमचे पोलीस ठाणेत निरंजन शंकर पाटील यांचे विरोधात तक्रारी अर्ज दाखल केला होता. सदरची तक्रार ही पैशाच्या देवाण घेवाणबाबत होती. त्यादिवशी निरंजन शंकर पाटील हे हुपरी पोलीस ठाणेत हजर होते. आरोपीचा जबाब मी स्वताः नोंद करून घेतला. आता मला दाखविण्यात आलेला आरोपीचा जबाब तोच आहे. तो नि.क्र. १७ वर आहे. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यात लिहलेला मजकूर खरा व बरोबर आहे. सदरचा जबाब आरोपीला वाचून दाखविला व त्यानंतर आरोपीची सही घेतली. आरोपीने माझे समक्ष जबाबावर सही केली.

**उलटतपास आरोपी मार्फत विद्वान विधीज्ञ श्री.एस.वाय.मुल्ला.**

२. दि. ३१/०१/२०२५ रोजी मला कारकुन डयुटीचे काम होते. हे म्हणणे खरे आहे की, एखादा तक्रारी अर्ज आला तर तो अर्ज संबंधीत पोलीसांकडे सदरचा अर्ज जातो. दि. ३१/०१/२०२५ रोजी मी ठाणे अंमलदार म्हणून कार्यरत नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, एखादा तक्रार अर्ज आल्यानंतर आमचे वरीष्ठाची त्या अर्जाची शहानिशा केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारी अर्जावर तपास करायचा असेल तर वरीष्ठांचा लेखी आदेश त्या अर्जावर केला जातो. हे म्हणणे खरे आहे की, मी आज रोजी वरीष्ठांचा तपास करण्याकरीता मला लेखी आदेश दिला तसा लेखी आदेश घेवून आलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला तक्रारी अर्जावर तपास करण्याचा वरीष्ठांनी कोणताही लेखी आदेश दिला नव्हता. साक्षीदाराला नि.क्र. १५ वरील तक्रारी अर्ज दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. १५ च्या तक्रारी अर्जावर आमचे वरीष्ठांचा कोणताही लेखी आदेश दिसून येत नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, तक्रार अर्ज दाखल झाल्यानंतर त्याची दफ्तरी दाखल रजिस्टरला नोंद केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, तसे दफ्तर रजिस्टर मी आज रोजी सोबत आणलेले नाही. मी ज्याचे विरूध्द तक्रारी अर्ज आला आहे त्यांना लेखी नोटीस पाठविली नाही. साक्षीदार स्वताः सांगतो की, मी आरोपीला फोन करून बोलावले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस नियमावली प्रमाणे ज्याचे विरूध्द तक्रार आली आहे त्याचे विरूध्द लेखी नोटीस देणे बंधनकारक आहे.

४. तक्रारी अर्जावरून मी गुन्हा दाखल केला नाही कारण आरोपी फिर्यादीला पैसे देतो म्हणाला व तसे लिहून दिले होते. आरोपीमध्ये व फिर्यादीमध्ये पोलीस ठाणेच्या बाहेर तडजोडीची चर्चा झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि. ३१/०१/२०२५ रोजी मी हुपरी पोलीस ठाणेत पोहेकॉ म्हणून कार्यरत होतो, महावीर अशोक पिंपळे यांनी त्या दिवशी आमचे पोलीस ठाणेत निरंजन शंकर पाटील यांचे विरोधात तक्रारी अर्ज दाखल केला होता, सदरची तक्रार ही पैशाच्या देवाण घेवाणबाबत होती, त्यादिवशी निरंजन शंकर पाटील हे हुपरी पोलीस ठाणेत हजर होते, आरोपीचा जबाब मी स्वताः नोंद करून घेतला, आता मला दाखविण्यात आलेला आरोपीचा जबाब तोच आहे, तो नि.क्र. १७ वर आहे. त्यावर माझी व आरोपीची सही आहे, त्यात लिहलेला मजकूर खरा व बरोबर आहे, सदरचा जबाब आरोपीला वाचून दाखविला व त्यानंतर आरोपीची सही घेतली, आरोपीने माझे समक्ष जबाबावर सही केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण- इचलकरंजी
दिनांक- ०७/०५/२०२६.

(**डी.बी.साठे**)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. २,
इचलकरंजी.